मसुदा मान्यतेसाठी
क्र. १/२०१७-१८

गोपनीय
व्यवस्थापन परिषद
*७ ऑगस्ट, २०१७*

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची ***सोमवार, दिनांक ७ ऑगस्ट, २०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता*** सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली होती. सभेमध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते:-

१. डॉ. संजय व्ही. देशमुख - (कुलगुरू)
२. डॉ. एम. ए. खान - (कुलसचिव)
३. श्री. दयानंद मेश्राम - ( सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, नामनिर्देशित)
४. डॉ. रोहीदास काळे - (सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग)

श्री. विजय फ. तायडे, स्थानापन्न वित्त व लेखा अधिकारी आणि श्री. दिपक वसावे, स्थानापन्न संचालक, परिक्षा व मुल्यमापन हे निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

**श्री ध्रुव घोष**

प्राख्यात सारंगी वादक पंडित ध्रुव घोष यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक १० जुलै, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५९ वर्षांचे होते.

**श्री मंगेश तेंडूलकर**

ज्येष्ठ व्यंगचित्रकार नाटयसमीक्षक श्री. मंगेश तेंडूलकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक ११ जुलै, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८१ वर्षांचे होते.

**श्रीमती. उमा भेंडे**

जेष्ठ अभिनेत्री श्रीमती उमा भेंडे यांचे दिर्घ आजाराने दिनांक १९ जुलै, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७२ वर्षांच्या होत्या.

**श्री बद्रीनारायण बारवाले**

उद्योजक आणि स्वातंत्र्यसैनिक श्री. बद्रीनारायण बारवाले यांचे वृध्दापकाळाने दिनांक २४ जुलै, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८७ वर्षांचे होते.

**प्रा. यशपाल**

प्रसिध्द वैज्ञानिक आणि शिक्षणतज्ज्ञ प्रा. यशपाल यांचे दिर्घ आजाराने दिनांक २४ जुलै, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षांचे होते.

**श्री. विजय खातू**

गणेश मूर्ती घडवणारे प्रसिध्द मूर्तिकार श्री विजय खातू यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक २६ जुलै, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६३ वर्षांचे होते.

**श्री. इंदर कुमार**

जेष्ठ अभिनेता श्री इंदर कुमार यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ४४ वर्षांचे होते.

**उस्ताद सईदुद्दीन डागर**

ख्यातनाम गायक उस्ताद सईदुद्दीन डागर यांचे अल्पशा आजाराने दिनांक ३१ जुलै, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७८ वर्षांचे होते.

**श्री. संतोष मोहन देव**

माजी केंद्रीय मंत्री श्री संतोष मोहन देव यांचे दिर्घ आजाराने दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८३ वर्षांचे होते.

तसेच मुंबई विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी जे या काळात निधन पावले त्यांनाही श्रंध्दाजली वाहण्यात आली.

बाब १: दिनांक १७ जून, २०१७ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचे इतिवृत्त व दिनांक १७ जून, २०१७ रोजीची स्थगित सभा दिनांक १ जुलै, २०१७ रोजीच्या सभेचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, १७ जून, २०१७ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचे इतिवृत्त व दिनांक १७ जून, २०१७ रोजीची स्थगित सभा दिनांक १ जुलै, २०१७ रोजीच्या सभेचे रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचे इतिवृत्त सूचनेसह मंजूर करण्यात आले.

बाब २: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०७ नुसार अधिष्ठाता मंडळाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ ते २०२२-२३ करिता तयार केलेला बृहत आराखडा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०७ नुसार अधिष्ठाता मंडळाने दिनांक ३० जुलै, २०१७ च्या बैठकीत बाब क्र.७ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ ते २०२२-२३ करिता तयार केलेला बृहत आराखडाचा मुसदा तसेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता नविन माहविद्यालय सुरू करण्या करिता तयार केलेला मुसदा व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीसह विद्वत परिषदेकडे सादर करत आहे.

बाब ३: मास्टर प्लॅनमधील हिंदी राष्ट्र भाषा भवन आणि उर्दु भाषा भवन यांची जागा निश्चित करणे.

ठराव: या अनुषगांने चर्चेमध्ये अशी माहिती देण्यात आली की, हिंदी भाषा भवन आणि उर्दु भाषा भवन यांची विद्यानगरी परिसरा मध्ये स्वतंत्र वास्तू मध्ये निर्मीती करण्यासाठी शासनाद्वारे प्रत्येकी २ कोटी रूपये आगाऊ रक्कम म्हणून देण्यात आली होती, तथापि विद्यापीठाच्या नव्याने तयार होणा-या मास्टर प्लॅन मध्ये अशा भवनांच्या निर्मीतीसाठी एकत्रित अशी बहुमजली वास्तू निर्माण करावी, असा ठराव व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक १४ मार्च, २०१७ च्या सभेमध्ये रोजी बाब क्र.५०. अन्वये पारित करण्यात आला होता.

या विषयावर विविध संस्थाकडून (उदा. माननीय मंत्री, आमदार, विधान सभा व विधान परिषद सदस्य तथापि व्यावसायिक व स्वयंसेवी संस्था, इत्यादी.) निवेदन आल्यानंतर आदरणीय मंत्री महोदय, उच्च व शिक्षण मंत्री श्री. विनोदजी तावडे यांनी संबधित लोक व विद्यापीठाचे अधिकारी यांच्याबरोबर एकत्रित चर्चा केली व विद्यापीठाच्या मास्टर प्लॅन मध्ये तात्कालिन व्यवस्थापन परिषदेने केलेल्या ठरावानुसार या दोन्ही भवनासाठी ( हिंदी भाषा भवन आणि उर्दु भाषा भवन) स्वतंत्र वास्तू देता येईल का? याबाबत अभ्यास करण्याचे आश्वासन दिले.

तद्नुसार विद्यापीठाच्या मास्टर प्लॅन तयार करण्याच्या प्रक्रिये मध्ये उपरोक्त मागणी पुर्ण होण्याची शक्यता असल्याने तशी तजविज

करण्यास हरकत नाही असे संबधित वास्तू विशारदांचे म्हणणे आहे, असे सांगण्यात आले.

त्याच बरोबर या दोन्ही वास्तूची( हिंदी भाषा भवन आणि उर्दु भाषा भवन) मास्टर प्लॅन मधील प्रस्तावित जागा दर्शविणारा नकाशा तयार करण्यात आला.

उपरोक्त चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठासाठी तयार करण्यात येणा-या मास्टर प्लॅन मध्ये विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक १४ मार्च, २०१७ रोजी बाब क्र.५०. च्या ठरावानुसार हिंदी भाषा भवन आणि उर्दु भाषा भवन यांच्या स्वतंत्र निर्मीतीसाठी शासनाने पैसे दिले आहेत. त्यानुसार विद्यापीठाच्या मास्टर प्लॅन मध्ये निर्देशित केलेल्या जागेवर त्यांची निर्मीती करण्यात यावी. तसेच हिंदी भाषा भवन आणि उर्दु भाषा भवन असे दोन भवनाचे वास्तू विषयक आराखडयाप्रमाणे मास्टर प्लॅन मधील सिध्दांतानुसार/तत्वानुसार नव्याने तयार करण्यात येवून त्यानुसार त्यांची निमिर्ती करण्यात येईल त्यानुसार या निर्मीतीचा संपूर्ण खर्च तरतुद तात्कालिन शासन निर्णयानुसार संबधित विभाग या संबधी शासनाशी पत्रव्यवहार करून उपलब्ध झालेली आगाऊ रक्कम त्वरित वापरण्यात येईल असे ठरले व तसे शासनास सविस्तर कळवावे.

बाब ४: दिनांक ३० जुलै, २०१७ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.

ठराव: वित्त व लेखा समितीच्या दिनांक ३० जुलै, २०१६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ता मधील बाब क्र.९ बाबत चर्चा करीत असताना असा ठराव करण्यात आला की, न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनी कडून कर्मचा-यासांठी मेडीकेल्म रू. १,५६,३५,००० /- उतरविण्यात यावा. त्यापैकी, रू. १०,५९२,५००/- इतकी रक्कम विद्यापीठ निधीतून देण्यात यावी. उर्वरीत रक्कम रू. ५०,४२,५००/- हि रक्कम कर्मचा-यांच्या वेतनामधून समान दराने कपात करावी. कपात करण्यात येणारी रक्कम कर्मचारी संख्येनुसार असेल. काही कर्मचारी सदर विमा योजना स्विकारणार नाहित. तेव्हा कपात करण्यात येणारी रक्कमेसाठी कर्मचा-याकडून संमती पत्र घेण्यात यावे व संमती दिलेल्या कर्मचा-यांची

संख्या व उर्वरित रक्कम यांचा अंदाज घेऊन ही कपात करावी. जर बहुतांश कर्मचा-यानी नकार दिल्यास पुन्हा एकदा विमा कंपनी सोबत वाटाघाटी करण्यात याव्यात तसेच या बाबातचे परिपत्रक आस्थापना (२/४) यांनी निर्गमीत करावे.

तसेच वित्त व लेखा समितीच्या बैठकीचे दिनांक ३० जुलै, २०१७ चे इतिवृत्त मंजूर करण्यात आले.

बाब ५: परीक्षा व मुल्यमापन मंडळाने घेतलेले निर्णय मंजूरीसाठी सादर.

ठराव: याबाबत असा ठराव करण्यात आला की, सद्य स्थितीत जे शिक्षक ३० उत्तरपत्रिकेची तपासणी करत असतील त्यांना १ महागाई भत्ता (डीए) दिला जातो व जे शिक्षक ५० किंवा त्यापेक्षा जास्त उत्तरपत्रिका तपासतील त्यांना प्रोत्साहानार्थ २ अतिरिक्त महागाई भत्ता (डीए) दिले जातील. (मानधना व्यतिरिक्त) तसेच जे शिक्षक पेपर तपासणीच्या कामामध्ये सहकार्य देणार नाही किंवा त्यांनी त्यांची जबाबदारी पुर्ण केली नाही त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात यावी.

तसेच असाही ठराव करण्यात आला की, परीक्षा व मुल्यमापन मंडळाने घेतलेले निर्णय परीक्षेच्या पुर्वलक्षी प्रभावाने लागू होतील.

बाब ६: ४६० अस्थायी कर्मचा-यांच्या सेवेबाबत निर्णय घेणेसाठी.

ठराव: याबाबत अशी चर्चा झाली की, ४६० अस्थायी कर्मचा-यांनी न्यायालयात न जाण्याचा निर्णय घेतला व तसे हमीपत्र लिहून दिले आहे. परंतु त्यांना कायम स्वरूपाचे हक्क दिले आहेत असे होईल व अशा कर्मचा-यांचा पुन्हा प्रश्न उपस्थित होऊ शकतो.

सविस्तर चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, ४६० अस्थायी कर्मचा-यांना सेवेमध्ये घेता येणार नाही.

बाब ७: कुलसचिव पदाची जाहीरातीस मुदतवाढ देणेबाबत.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, कुलसचिव पदाच्या जाहीराती नुसार अर्ज स्विकारण्याचा दिनांक ७ ऑगस्ट, २०१७ हा शेवटचा दिवस असून कुलसचिव सध्या विद्यापीठ सेवेत कार्यरत आहेत. कुलसचिवांना कार्यमुक्त केल्यानंतर दुसरी जाहिरात देण्यात यावी तसेच ज्या व्यक्तीने अगोदरच्या जाहिरातीनुसार अर्ज केलेले आहेत त्यांना पुन्हा अर्ज करण्याची गरज भासणार नाही. त्यांचे अर्ज पुढील जाहिरातीनुसार ग्राहय धरण्यात येतील.

बाब ८: To obtain approval for the Minutes of the First Meeting of the Board of Students' Development held on Tuesday, July 11, 2017 at 11:00 a.m. at Management Council Room, Fort, University of Mumbai to plan and oversee the various cultural and welfare activities of the students in colleges, institutions and university departments for the academic year 2017-18.

ठराव: It is **resolved** that the Minutes of the First Meeting of the Board of Students' Development held on Tuesday, July 11, 2017 at 11:00 a.m. at Management Council Room, Fort, University of Mumbai to plan and oversee the various cultural and welfare activities of the students in colleges, institutions and university departments for the academic year 2017-18 **is accepted.**

बाब ९: व्यवस्थापन परिषदेत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ५७ मधील तरतुदीनुसार क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ गठीत करण्याबाबतचा प्रस्ताव.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, व्यवस्थापन परिषदेत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ५७ मधील तरतुदीनुसार क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ गठीत करण्याबाबत माननीय कुलगुरूंना सदस्य नामनिर्देशित करण्यास मान्यता देण्यात आली.

बाब १०: Request of the Principal, Kandivali Education Society's Law College, Shantilal Modi Road, Kandivli (W), Mumbai- 400 067 vide letter No. KESLC/84/2016-17 dated 19th May, 2017 to change the name of the college from "KES Law College" to "Jayantilal H. Patel law Cogllege."

ठराव: It is **resolved** that the request of the Principal, Kandivali Education Society's Law College, Shantilal Modi Road, Kandivli (W), Mumbai-400 067 vide letter No. KESLC/84/2016-17 dated 19th May, 2017 to change the name of the college from "KES Law College" to "Jayantilal H. Patel law College" **is accepted.**

बाब ११: शिवाजी इस्टिटयूट ऑफ एज्यूकेशन ॲन्ड रिसर्चचे लक्ष्मीनारायण कॉलेज ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, फोंडाघाट, ता. कणकवली, जि. सिंधुदूर्ग हे महाविद्यालय स्थलांतरीत करणेबाबतचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत

ठराव: असा ठराव करण्यात आला की, शिवाजी इस्टिटयूट ऑफ एज्यूकेशन ॲन्ड रिसर्चचे लक्ष्मीनारायण कॉलेज ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, फोंडाघाट, ता. कणकवली, जि. सिंधुदूर्ग हे महाविद्यालय स्थलांतरीत करणेबाबतचा प्रस्ताव मागे घेण्यासाठी आलेल्या प्रस्तावार निर्णय घेण्यासाठी त्वरित समिती नेमावी व एक महिन्यात अहवाल सादर करावा.

सदर बाब अहवालासोबत व्यवस्थापन परिषदेत पुन्हा सादर करावी.

SKSawant

सहायक कुलसचिव

उपकुलसचिव

कुलसचिव

कुलगुरू

# व्यवस्थापन परिषद ७ ऑगस्ट, २०१७

पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रती या बाबतच्या चर्चेच्या अनुषगांने मा. कुलगुरूंनी सभागृहास माहिती दिली की, पुर्नमुल्यांकन करिता असलेली फी रू. ५०० वरून निम्म्याने म्हणजेच रू. २५०/- करण्यात येत आहे व मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी रू. २५०/- वरून निम्म्याने म्हणजेच रू. १२५/- करण्यात येत आहे. तसेच उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी रू. १००/- वरून निम्म्याने म्हणजेच रू. ५०/- करण्यात येत आहे व मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी रू. ५०/- वरून निम्म्याने म्हणजेच रू. २५/- फी करण्यात येत आहे .

या चर्चेस सभासदांनी सहमती देवून पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रतीसाठी फी निम्म्याने करण्यास मान्यता दिली. त्याप्रमाणे परिपत्रक निर्गमित करण्याचे आदेश देण्यात आले.

7/8/17

कुलसचिव

कुलगुरु